
All PDF Collection
PDF Seva

# श्री स्वामी समर्थ मालामंत्र




॥ श्री गणेशाय नमः ॥ ॐ द्रां दत्तात्रेयाय नमः ॥
॥ श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ ॥

जगदंबिका म्हणे । मालामंत्र नारायणे ।
कथिला जो जगत्कारणे । तो हा सर्वोत्तम असे ॥
ॐ नमो नमो भगवंता । नमोजी श्री स्वामीसमर्था ।
स्मरणगामी दत्तनाथा । योगीमुनिजन वंदिता ॥
चिदानंदात्मका त्र्यंबका । विश्वेश्वरा विश्वधारका ।
बालोन्मत्त पिशाच्चवेषा । महायोगीश्वरा परमहंसा ॥
चित्-चैतन्या चिरंतना । अवधूता निरंजना ।
जगदाधारा सुदर्शना । सुखधामा सनातना ॥
सकलकामप्रदायका । सकलदुरितदाहका ।

Visit Website : https://www.PDFSeva.Net

सकल संचित-कर्महरा । सकल संकष्ट-विदारा ॥
ॐ भवबंधमोचना । ॐ श्रीं परम ऐश्वर्यघना ।
ॐ स्वां स्वहितधर्मचालका । ॐ मीं नित्य यशदायका ॥
ॐ सं संसारचक्रछेदका । ॐ मं महाज्ञानप्रदायका ।
ओमर्था महावैराग्यसाधका । ॐ नं नरजन्मसार्थका ॥
ॐ मों महाभयनिवारका । ॐ भक्तजनहृदयनिवासा ।
परकृत्या थोपव थोपव । परमंत्रा शांतव शांतव ॥
परयंत्रा विखर विखर । ग्रहभूतादि पिशाच्चपीडा हर हर ।
दारिद्र्यदु:खा घालव घालव । सुखशांती फुलव फुलव ॥
आपदा विपदा मालव मालव । गृहदोष वास्तुदोष पितृदोष
सर्पदोषादि सकल दोषा विरव विरव ।
अहंकारा नासव नासव । मनचित्तबुद्धी स्थिरव स्थिरव ॥
नमोजी नमो देव महादेव । देवाधिदेव श्री अक्कलकोट ।
स्वामी समर्थ श्रीगुरुदेव । नमो नमो नमो नमः ॥ ( सप्तशते सिद्धिः ) ॥

॥ श्रीस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥
॥ श्रीगुरुदेवदत्त ॥
॥ श्रीगुरूदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

***************

Visit Website : https://www.PDFSeva.Net